
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 JAN 2026

महा न्यूज & व्ह्यूज




# विद्यापीठात १६ जानेवारी रोजी 'प्रा. एन. डी. पाटील: विचारविश्व आणि प्रबोधन' या विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी 'प्रा. एन. डी. पाटील: विचारविश्व आणि प्रबोधन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानामध्ये 'प्रा. एन. डी. पाटील: विचारविश्व आणि प्रबोधन' या विषयावर मा. प्रसाद कुलकर्णी (इचलकरंजी) मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे असणार आहेत. हा कार्यक्रम मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी सकाळी ११.०० वाजता सुरू होणार आहे. तरी सर्वांनी या व्याख्यानासाठी उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.एन.डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या अध्यासनाचे समन्मयक प्रा.डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 JAN 2026


महा न्यूज & व्ह्यूज




# कवितेमुळे माणूस म्हणून विचार करता येतो : प्रा. श्यामसुंदर मिरजकर

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

कविता ही मानवतेची सर्वात सुंदर परिभाषा आहे. कविता स्वतःकडे दुसऱ्याच्या नजरेने पाहायला शिकवते. कविता केवळ शब्दांचा खेळ नसतो, तर घटना आणि अनुभूतीला संवेदनशीलतेची जोड मिळाल्याने उत्तम कवितेची निर्मिती होते. कवितेमुळे समाजात जगताना माणूस म्हणून विचार करता येतो, असे मत प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग येथे 'लेखक संवाद' या कार्यक्रमात बोलत होते. प्रमुख उपस्थितीत प्रा. नंदकुमार मोरे होते.



ते म्हणाले, कवीची प्रगती जाती-धर्माच्या भिंतीत होत नाही. त्यासाठी त्याला सामाजिक व्हावे लागते. हा विकास वाचनातून होतो. वाचन हे अंधारून आलेल्या काळात उजेडासारखे असते. फुलून येणाऱ्या क्षणांची सोबत असते. हे सर्व कवितेमुळे लक्षात येते. खरे तर जीवनाचा तोल सांभाळण्याचे काम कविता करते. यावेळी त्यांनी 'इचलकरंजी कविता', 'दुखणं' व 'एक सेल्फी मित्रासोबत' या कविता सादर केल्या.

मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. ऋणाली नांद्रेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुखदेव एकल, संशोधक विद्यार्थी, एम.ए.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

16 JAN 2026

पुढारी

# कवितेमुळे माणूस म्हणून विचार करता येतो : प्रा. मिरजकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कविता ही मानवतेची सर्वात सुंदर परिभाषा आहे. कविता स्वतःकडे दुसऱ्याच्या नजरेने पाहायला शिकवते. कविता केवळ शब्दांचा खेळ नसतो, तर घटना व अनुभूतीला संवेदनशीलतेची जोड मिळाल्याने उत्तम कवितेची निर्मिती होते. कवितेमुळे समाजात जगताना माणूस म्हणून विचार करता येतो, असे मत प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग येथे 'लेखक संवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख उपस्थितीत प्रा. नंदकुमार मोरे होते.

प्रा. मिरजकर म्हणाले, कवीची प्रगती जाती-धर्माच्या भिंतीत होत नाही. त्यासाठी त्याला सामाजिक व्हावे लागते. हा विकास वाचनातून होतो. वाचन हे अंधारून आलेल्या काळात उजेडासारखे असते. फुलून येणाऱ्या क्षणांची सोबत असते. हे सर्व कवितेमुळे लक्षात येते. खरे तर जीवनाचा तोल सांभाळण्याचे काम कविता करते. यावेळी त्यांनी 'इचलकरंजी कविता', 'दुखणं' व 'एक सेल्फी मित्रासोबत' या कविता सादर केल्या. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. ऋणाली नांद्रेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुखदेव एकल, राष्ट्रपती पदक विजेते अक्षय जहागीरदार, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

16 JAN 2026

तरूण भारत



कोलोली : श्रीपतराव चौगुले कॉलेजमधील पारितोषिक वितरणप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे, समवेत डॉ. के. एस. चौगुले, डॉ. एस. ए. जमादार, सागर पाटील, शिवाजीराव पाटील, मान्यवर.

# विद्यार्थ्यांनी वाचन करणे गरजेचे : कुलसचिव शिंदे

वार्ताहर
कोलोली

विद्यार्थ्यांनी हुशारीचा वापर विधायक कामासाठी कराव, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांनी आचार विचार बदलण्यासाठी भरपूर वचन करणे काळाची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी–कोतोली येथील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले होते. कार्यक्रमास मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. जी. टी. पाटील, खजानीस मारुती चौगुले, सचिव शिवाजी पाटील, संचालक कल्पनाताई चौगुले, प्रकाश पाटील, प्रा. वेदिका चौगुले, डॉ. अजय चौगुले, विजय चौगुले, डॉ. भालचंद्र कोरे, डॉ. मीना पाटील होते. श्रीपतराव चौगुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दस्तऐवज ज्ञानामृत वाटचाल पंचवीस वर्षाची या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. विविध स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. अहवालाचे वाचन प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी केले. प्रास्ताविक व स्वागत प्रा. रवींद्र चौगुले यांनी केले पाहुण्यांची ओळख प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण करुन दिली. आभार प्रा. ए. आर. महजन यांनी केले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, माजी विद्यार्थी, पालक, नागरिक उपस्थित होते.

16 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाणी, वनस्पती, जंगल जतन करणे काळाची गरज

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन : मौजे माले येथे डीकेएएससी कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर

प्रतिनिधी
इचलकरंजी

पाणी वनस्पती आणि जंगल यांचे जतन करणे हे मानवी जीवनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहे. ती काळाची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर उद्‌घाटनप्रसंगी व्यक्त केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे मौजे माले येथे सुरू झालेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मालेचे सरपंच राहुल कुंभार होते.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, शुद्ध पंचगंगा मानवाने शुद्ध केली. पाण्याचे महत्त्व आपल्या परिसरातील लोकांना फार उशीरा कळाले. हे सांगत असताना त्यांनी नांदेड येथील एका गावातील श्यामसुंदर या सरपंचाची मुलगी पिण्याच्या पाण्याच्या कमतरतेने मृत्यू पावली. या घटनेने ते अस्वस्थ झाले आणि गावात जलसंवर्धन आणि वृक्ष संवर्धन करण्याचा संकल्प केला. या अनुषंगाने त्यांनी प्रयत्न केल्याने गावचा चेहरामोहरा बदलला. गाव पाण्याच्या दुष्काळापासून मुक्त झाले. आजही या गावात एक मुलगी जन्माला आली की १११ झाडे लावली जातात. हा प्रयोग अनेक वर्षापासून सुरू आहे.



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे मौजे माले येथे सुरू झालेल्या श्रमसंस्कार शिबिराप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, सरपंच राहुल कुंभार.

शिवाजी विद्यापीठाचेही उदाहरण दिले. शिवाजी विद्यापीठात कांही वर्षापूर्वी पाण्याची कमतरता होती. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जलसंवर्धन करणे हे सुचले आणि त्यातून जलसंवर्धन करण्यासाठी विद्यापीठ परिसरामध्ये तलाव निर्माण करण्यात आले. आज या तलावातून विद्यापीठाला लागणारा सर्व पाणीपुरवठा स्वतंत्रपणे केला जातो. यातून विद्यापीठाचा पाणी प्रश्न मिटल्याचे सांगितले.

सरपंच राहुल कुंभार यांनी, माले या गावची भूजलपातळी वाढवण्यासाठी आणि पर्जन्यमान वाढ होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजनेचा कॅम्प घेतल्याचे मत त्यांनी मांडले. मागील वर्षाच्या श्रमदानातून २५ टक्के भूजल पातळी वाढल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी, नॉट मी बट यू असे सांगत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून माले गावच्या भूजल पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. याबद्दल आम्ही समाधानी आहोत, असे मत व्यक्त केले. गावाचा विकास आमच्या सहकार्यातून होत आहे ही खूप अभिमानाची गोष्ट आहे.

मालेगावातील पाणी फौंडेशनचे सर्व पदाधिकारी एनएसएस प्रकल्प अधिकारी डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, पूजा पारिशवाड, डॉ. सुभाष जाधव उपस्थित होते. सूत्रसंचलन संदीप पाटील यांनी केले. आभार डॉ. अजिंक्य पत्रावळे यांनी मानले. याप्रसंगी उपसरपंच, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, सदस्य, नागरिक, स्वयंसेवक उपस्थित होते.

16 JAN 2026

लोकमत

# कवितेमुळे माणूस म्हणून विचार करता येतो

## श्यामसुंदर मिरजकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कविता ही मानवतेची सर्वांत सुंदर परिभाषा आहे. कविता स्वतःकडे दुसऱ्याच्या नजरेने पाहायला शिकविते. कविता केवळ शब्दांचा खेळ नसतो, तर घटना आणि अनुभूतीला संवेदनशीलतेची जोड मिळाल्याने उत्तम कवितेची निर्मिती होते. कवितेमुळे समाजात जगताना माणूस म्हणून विचार करता येतो, असे मत प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील 'लेखक संवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रा. नंदकुमार मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मिरजकर म्हणाले, कवीची प्रगती जाती-धर्माच्या भिंतीत होत नाही. त्यासाठी त्याला सामाजिक व्हावे लागते. खरे तर जीवनाचा तोल सांभाळण्याचे काम कविता करते. यावेळी त्यांनी 'इचलकरंजी कविता', 'दुखणं' आणि 'एक सेल्फी मित्रासोबत' या कविता सादर केल्या.

विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. ऋणाली नांद्रेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुखदेव एकल यांच्यासह संशोधक विद्यार्थी, एम. एचे विद्यार्थी उपस्थित होते.